**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक १५ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्रातल्या नवनिर्वाचित सरकारच्या मंत्रिमंडळाचा आज विस्तार; राज्यपालांनी दिली ३९ मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ.**
2. **विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या चहापानावर महाविकास आघाडीच्या घटक पक्षांचा बहिष्कार.**
3. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा 112 वा दीक्षांत समारंभ उद्या दुपारी 12 वाजता राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत होणार.**
4. **विदर्भ गारठला; नागपुरात ७ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद; उद्या गोंदिया, नागपूर, वर्धा आणि अकोला जिल्ह्यासाठी थंडीचा येलो अलर्ट जारी.**

राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार

राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार सध्या नागपूरच्या राजभवनात होत असून राज्यपाल सी पी राधाकृष्णन या मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देववत आहेत. या सोहळ्याचं सूत्रसंचालन राज्याच्या सचिव सुजाता सौनिक करत आहेत. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून----

***विधानसभा निवडणुकांमध्ये मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर देवेंद्र फडणवीस यांनी 5 डिसेंबर रोजी मुंबईच्या आझाद मैदान इथं मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर आज 15 डिसेंबर रोजी नागपुरात राजभवनात मंत्रिमंडळाचा विस्तार होत आहे. राज्यपाल सीपी राधाकृष्णन हे मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देत आहे. आतापर्यंत भाजपच्या - चंद्रशेखर बावनकुळे (कामठी), राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रकांत पाटील (कोथरूड), गिरीश महाजन (जामनेर), गणेश नाईक (ऐरोली), मंगल प्रभात लोढा (मलबार), जयकुमार रावल (शिंदखेडा), पंकजा मुंडे (परळी), अतुल सावे (संभाजी नगर पूर्व), अशोक उईके (राळेगाव), ॲड आशिष शेलार, शिवेन्द्रराजे भोसले (सातारा), जयकुमार गोरे (माण), संजय सावकारे (भुसावळ), नितेश राने (कणकवली), आकाश फुंडकर यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आहे.***

***तर शिवसेनेच्या गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), दादा भुसे (मालेगाव बाह्य) संजय राठोड (दिग्रस दारव्हा), उदय सामंत (रत्नागिरी), शंभुराज देसाई (पाटण), संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भारत गोग्गावले यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली.***

***राष्ट्रवादी कॉंग्रेसचे हसन मुश्रीफ, मतदारसंघ कागल, धनंजय मुंडे (परळी), दत्तात्रय भरणे (इंदापूर), आदिती तटकरे (श्रीवर्धन), माणिकराव कोकाटे (सिन्नर), नरहरी झिरवाळ (दिंडोरी), मकरंद जाधव यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. दरम्यान विधी***

***मंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात होत आहे. (आकाशवाणी वृत्त विभागातून मी नम्रता)***

देवेंद्र फडणवीस स्वागत रॅली

तत्पूर्वी, मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्यांदाच देवेंद्र फडणवीस यांचं आज दुपारी १२ वाजता नागपुरात आगमन झालं. त्यांच्यासाठी स्वागत रॅली काढण्यात आली. ठिकठिकाणी रांगोळ्या आणि फुलांचा वर्षाव करण्यात आला.त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, परिणय फुके आदि उपस्थित होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देखील नागपूरकरांच्या वतीनं फडणवीसांचं स्वागत केलं.

अजित पवार सत्कार

शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांची विचारधारा घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस काम करत आहे, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षाची भूमिका नागपूर इथल्या मेळाव्यात व्यक्त केली. आज दुपारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विदर्भातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा मेळावा देशपांडे सभागृहात पार पडला. महाराष्ट्राला पुढं न्यायचं आहे, हे एकच ध्येय महायुतीचे आहे. पक्षातील आमदारांना अडीच वर्षासाठी मंत्रिपदाची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे इतर आमदारांना संधी मिळेल, असंही पवार यांनी स्पष्ट केलं. आपल्या ध्येयधोरणात विदर्भावर कुठेही अन्याय होऊ देणार नाही, असं आश्वासन पवार यांनी यावेळी दिलं.

अधिवेशन तयारी आढावा

महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. त्या अनुषंगाने विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी तयारीचा आढावा घेतला. अधिवेशन कालावधीत कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी यंत्रणांना केल्या.

चहापानावर बहिष्कार

बीडमध्ये सरपंचाचा झालेला खून, परभणीमध्ये दलित तरुणाची झालेली हत्या, यासोबतच बीडमध्ये गेल्या वर्षभरात 32 जणांची झालेली हत्या या सगळ्याची उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींची समिती नेमून त्याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करत विरोधी पक्षाने उद्यापासून नागपुरात सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या चहापानावर बहिष्कार घातला आहे. महाविकास आघाडीच्या सदस्य घटक पक्षांनी आज बैठकीनंतर पत्रकारांना संबोधित केलं. विधान परिषदेतले विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे

नेते जितेंद्र आव्हाड हे या पत्रकार परिषदेला उपस्थित होते. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना आणि लाडक्या बहिणींना दिलेली आश्वासने तातडीने पूर्ण करावीत, तसंच नागपुरात उद्यापासून सुरू होणाऱ्या अधिवेशनाचा कालावधी वाढवावा, अशी मागणी विरोधी पक्षनेत्यांनी केली आहे. यावेळी दानवे म्हणाले

***तीन-तीन आठवड्यांचं एकेक महिन्यांचं होणारं अधिवेशन आता पाच आणि सहा दिवसांवर येऊन ठेपलं आहे. आणि त्यातूनही लक्षवेध घेऊन नाही काही प्रश्न उत्तरे नाही अशी स्थिती आहे. आणि या परिस्थितीमध्ये भलेही छोटं अधिवेशन असेल पण एक विरोधी पक्ष म्हणून ताकदीने या सरकारच्या सगळ्या कारभाराला, स्थितीला विरोध करण्याचा निर्णय मी सगळ्या महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी घेतलेला आहे.***

विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदाबाबत महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत. याउलट अध्यक्षांनी परंपरा लक्षात घेता आघाडीच्या नेत्याला विरोधी पक्षनेते पद द्यावं, अशी मागणी जितेंद्र आव्हाड आणि अंबादास दानवे यांनी या पत्रकार परिषदेत केली.

रामदास आठवले

विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला एकही जागा दिली नाही, तरी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे भाजप महायुतीला साथ दिली. मात्र रिपब्लिकन पक्षाला न्याय मिळाला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेकदा आश्वासनं दिली, तरीही मंत्रिमंडळात रिपब्लिकन पक्षाला स्थान दिलं नसल्याने रिपब्लिकन कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे, असं सांगत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या संदर्भात रामदास आठवले यांनी आज बांद्रा इथं पत्रकार परिषद घेतली.

दीक्षांत समारंभ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा 112 वा दीक्षांत समारंभ उद्या दिनांक 16 डिसेंबर रोजी दुपारी 12 वाजता ऑडोटोरियम हॉल, नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, राजनगर, इथं होणार असून समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलगुरू सी.पी. राधाकृष्णन राहतील. या दीक्षांत समारंभामधे 1 लाख 3 हजार 303 विद्यार्थ्यांना पदवी/ पदविका प्रदान करण्यात येणार आहेत. दीक्षांत समारंभात परीक्षेमधे स्पृहणीय यश संपादन केल्याबद्दल 227 पुरस्कार वितरित केले जाणार आहेत. या दीक्षांत समारंभात विद्याशाखानिहाय 221 संशोधकांना आचार्य पदवी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. पारितोषिकांमधे 193 सुवर्ण, 8 रजत आणि 26 रोख असे एकूण 227 पुरस्कार दिले जाणार आहेत. यामधे 95 मुली आणि 48 मुलांचा समावेश आहे.

चित्रपट महोत्सव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि नागपूर चलचित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानं ११ आणि १२ जानेवारी २०२५ रोजी नागपूर फिल्म फेस्टिवलचं आयोजन करण्यात आलं आहे. अशा प्रकारच्या फिल्म फेस्टिवलचे नागपुरात प्रथमच आयोजन होत असून विद्यापीठात फेस्टिवलच्या चलचित्राचे अनावरण काल प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या हस्ते करण्यात आलं.

हवामान

राज्यात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर वाढला आहे. काल राज्याच्या किमान तापमानाचा पारा 10 ते 12 अंशांवर आला. त्यामुळे कोकण वगळता अवघ्या राज्यात थंडीची लाट तीव्र झाली आहे. शनिवारी राज्यातील सर्वात कमी तापमान धुळ्यात नोंदवण्यात आलं. या ठिकाणी 4.4 दशांश अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. विदर्भात सर्वाधिक किमान तापमानाची नोंद नागपूर इथं झाली. नागपुरात आज पहाटे सात अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवलं गेलं. वर्ध्यात सात पूर्णांक ४, गोंदियात सात पूर्णांक दोन आणि भंडाऱ्यात आठ अंश सेल्सिअस, गडचिरोलीत दहा, चंद्रपुरात 10.6 दशांश अंश सेल्सियस इतकं किमान तापमान राहिलं. पश्चिम विदर्भात बुलढाणा इथं दहा पूर्णांक तीन, अकोला इथं नऊ पूर्णांक 6, अमरावती इथं दहा पूर्णांक पाच, तर वाशिम इथं बारा पूर्णांक दोन इतकं किमान तापमान राहिलं. उद्या दिनांक 16 डिसेंबर रोजी गोंदिया, नागपूर, वर्धा आणि अकोला इथं थंडीची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्यानं हवामान खात्यानं या जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी केला आहे.

राज्यात आगामी दोन दिवस थंडीचा कडाका कायम राहणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्यातील किमान तापमानात गेल्या 24 तासांत 2 ते 4 अंशांनी घट झाली.

कसोटी क्रिकेट

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात दुसऱ्या दिवसाची सुरुवात ऑस्ट्रेलियानं कालच्या २८ धावांवरून केली. त्यानंतर ऑस्ट्रेलियानं पहिले तीन बळी झटपट गमावले. आजच्या दिवसाचा खेळ थांबला, तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ७ बाद ४०५ धावा झाल्या होत्या.

*****